जुलै – ऑगस्ट १९९५

रु. ८

# श्री साईलीला

श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत नियतकालिक



# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## विश्वस्त मंडळ


श्री. द. म. सुकथनकर
(अध्यक्ष)

श्री. मोहन मो. जयकर
श्री. रमेश दा. सोनी
श्रीमती रेखा ग. दिघे
श्री. प्रकाश व. कारखानीस
श्री. मुकेश र. पटेल
श्री. मधुकर द. जोशी
श्री. प्रकाश पी. वैशंपायन
श्री. मधुकर ज. गर्दे पाटील
श्री. देवकीनंदन सारस्वत
श्री. आप्पासाहेब खं. कोते

श्री. रायभान ग. चिने
श्री. भास्कर शं. बोरावके
श्री. अण्णासाहेब सा. म्हस्के पाटील
श्री. दयालाल हि. पटेल
श्री. राजीव पुं. रोहोम
श्री. संभाजी कि. काळे
श्री. अशोक भि. खांबेकर
सौ. प्रेमाबाई सी. बज
श्री. रामचंद्र नि. गोसावी
श्री. प्रभाकर तु. बोरावके
श्री. सोपान मा. धोर्डे

श्री साईबाबा संस्थान शिरडीचे
अधिकृत नियतकालिक

# श्री साईलीला

वर्ष ७४ अंक ४-५
जुलै-ऑगस्ट १९९५

संपादक
● द. म. सुकथनकर ●

कार्यकारी संपादक
● विद्याधर ताठे ●

कार्यालय
'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग
दादर, मुंबई - ४०० ०१४
दूरध्वनी : ४१२ २५ ६१
फॅक्स : (०२२) ४१५ ०७ ९८

अक्षर जुळणी
*शंतनु ग्राफिक्स,* मुंबई ४०० ०२५

मुद्रक
*गीता ऑफसेट,* वडाळा

वार्षिक वर्गणी - रु. ५०/-
आजीव सभासद वर्गणी - रु. १०००/-
परदेशाकरिता वार्षिक वर्गणी - रु. १०००/-
(टपाल खर्चासहित)
अंकाची किंमत रु. ८ फक्त

मुद्रक, प्रकाशन द. म. सुकथनकर, अध्यक्ष श्री. साईबाबा संस्थान शिरडी यांनी हे नियतकालिक, 'साईनिकेत', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर मुंबई-४०० ०१४ येथे छापून प्रसिद्ध केले.

या नियतकालिकातील लेखांत प्रसिद्ध झालेली मते ही त्यातील लेखकांची स्वतंत्र मते असून त्या मताशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.



या हो या हो अवघेजन। करा बाबासी वंदन।।

## अंतरंग


| | | | |
|---|---|---|---|
| ★ | संपादकीय | द. म. सुकथनकर | २ |
| ★ | साईनाथ-सत्यदेव | शाम जुवळे | ३ |
| ★ | दिव्यज्ञानाचा अमृतकुंभ | ग. के. कुलकर्णी | ६ |
| ★ | पालखी सोहळा | विद्याधर ताठे | २० |
| ★ | भीमाके तट निकट | संत कबीर | २३ |
| ★ | साई शिकवण | जनार्दन बांदेकर | २४ |
| ★ | पाऊले चालती शिर्डीची वाट | भा. के. गन्द्रे | २७ |
| ★ | हरामची कमाई | ह. ल. रानडे | ३१ |
| ★ | गजानन महाराज बोधामृत | सु. ह. जोशी | ३५ |
| ★ | एकनाथ भागवतातील विचार मोती | कृष्णा तेली | ३७ |
| ★ | विवेक विचार | चं. वि. जोशी | ४० |
| ★ | साधना साधक साध्य | माधवराव भागवत | ४२ |
| ★ | रामनामाचे वैचारिक महत्त्व | भा. के. गन्द्रे | ४५ |
| ★ | संत साहित्याचा अभ्यास | डॉ. हे. वि. इनामदार | ५१ |
| ★ | संत नामदेवाचे हिंदी भक्तिकाव्य | डॉ. अशोक कामत | ५२ |
| ★ | अभिप्राय | | ५५ |

## संपादकीय

# शिर्डी माझे पंढरपूर। साईबाबा रमावर।।

'श्री **साईलीला'** नियतकालिकाचा हा जुलै-ऑगस्ट महिन्याचा अंक काही अपरिहार्य अशा कारणांमुळे आपल्या हाती देण्यास आम्हाला बराच विलंब झालेला आहे. साईभक्तांचे 'श्रीसाईलीला' नियतकालिका वरील प्रेम विलक्षण असून त्या भांडवलाच्या जोरावरच आम्ही या नियतकालिकाची विस्कटलेली घडी नीट बसविण्याचा जोरदार प्रयत्न सुरू केलेला आहे. पुढील अंकापासून नियतकालिकाच्या प्रकाशनात नियमितपणा येईल असा मला विश्वास वाटतो.

या अंकामध्ये श्रीमद् भगवद् गीतेबद्दल श्री **गजानन कुलकर्णी** यांचा सविस्तर लेख समाविष्ट करण्यात आला आहे. गीता हा दिव्यज्ञानाचा अमृतकुंभ आहे. आपले जीवनही अमृतमय व्हावे अशी या लेख प्रकाशनामागे आमची भावना आहे. आळंदीहून पायी पंढरपूरला आषाढी महायात्रेसाठी जाणारा श्री ज्ञानदेवांचा पालखी सोहळा ही केवळ एक भाबडी परंपरा नसून ते एक जनजागरण आहे. अशा या अनेक वर्षांची प्रदीर्घ परंपरा असलेल्या लोकजागरणाबद्दल आमचे **कार्यकारी संपादक विद्याधर ताठे** यांनी लिहिलेला लेख, आपणास पंढरीची पायी यात्रा करावी अशी प्रेरणा देणार ठरावा. साईबाबांनी 'पंढरीच्या वारीस जा' असा उपदेश अनेकांना केलेला होता. संतकवि दासगणू यांना श्रीसाईबाबांनी विठ्ठलरूपात दर्शन दिले होते म्हणूनच **'शिरडी माझे पंढरपूर। साईबाबा रमावर।** असे अभंगवचन त्यांच्या मुखातून बाहेर पडले असावे. विठ्ठलाबद्दल श्री साईबाबांना किती प्रेम होते ते भगवंतराव क्षीरसागर यांच्या कथेतून पाहण्यासारखे आहे. भगवंतरावांचे वडील विठ्ठलभक्त होते. नित्य विठ्ठलमूर्तीची पूजाअर्चा ते करीत असत. वडिलांचे निधन झाल्यावर घरातील विठ्ठलपूजा बंद पडली, तेव्हा भगवंतरावांना बोलावून घेऊन श्री साईबाबांनी विठ्ठलपूजा पूर्ववत् प्रारंभ करण्यास सांगितले, पंढरीची वारी करण्यास बजावले.

या अंकात श्री संत एकनाथ महाराजांच्या भागवतामधील 'विचार मोती' आम्ही दिलेले आहेत. ते संग्राह्य असे आहेत. श्री साईबाबा काकामहाजनींनी आणलेला भागवत ग्रंथ त्यांचा लाडका भक्त शामा (माधवराव देशपांडे) यास देतात व "ग्रंथ जपून ठेव तुला अत्यंत उपयुक्त ठरेल" असे सांगतात. यावरुन श्री साईबाबांची भागवताबद्दल असलेली श्रद्धा दिसून येते. गीता हा ग्रंथ भगवान श्रीकृष्णाचे **तत्त्वज्ञान दर्शन** आहे तर भागवत हे कृष्णलीलांचे, म्हणजेच श्रीकृष्णांचे **जीवन दर्शन** आहे. अशा दोन्ही ग्रंथांविषयी प्रस्तुतच्या अंकात आम्ही दिलेले लेख वाचकांना संग्राह्य वाटतील अशी आशा आहे.

भक्त कबीर हे श्री साईबाबांचे पूर्वावतार होत. संत दासगणू यांच्या अनेक ओव्यांमध्ये श्री बाबांचा उल्लेख कबीराचे अवतार असा करण्यात आलेला आहे. **'आता वन्दु सिध्द महंत। जे क्षमा शांतींचे कोष सत्य। जे कबीर अवतार साक्षात। साईबाबा शिर्डीचे।'**

दासगणूंनी हे सर्व काव्य बाबांच्या उपस्थितीत व त्यांना दाखवूनच केलेले आहे. ही गोष्ट लक्षात घेता श्री बाबांनी आपण कबीर अवतार असल्याचे नाकारले नव्हते हे लक्षात घेण्यासारखे आहे. भक्त कबीर हिंदी भाषिक व केवळ उत्तर भारतीय होते असे समजणे अन्यायाचे आहे. ते सर्वच संतांप्रमाणे विश्वव्यापक होते. म्हणूनच कबीरांनी आपल्या काव्यात महाराष्ट्रातील पंढरी क्षेत्राचा महिमा गायलेला आहे. तो महिमा आम्ही या अंकात संक्षिप्तपणे दिला असून कबीरांच्या काव्याबरोबरच त्यांच्या व्यापक-उदार दृष्टीचेही वाचकांना दर्शन घडविण्याचा आम्ही प्रयत्न केलेला आहे.

श्री साईलीलाची विस्कटलेली घडी पूर्वपदावर आणण्याच्या दृष्टीने थोड्याशा घाईगडबडीतच आम्ही मागील राहिलेले अंक प्रकाशित करीत आहोत. त्यामुळे पाहिजे तेवढ्या सुनियोजितपणे अंकांची मांडणी होत नाही, पण घडी बसताच अत्यंत वाचनीय-संग्राह्य असा अंक देण्याचा आमचा मानस आहे. त्या दृष्टीने विविध मान्यवर लेखकांशी आमचा संपर्क सुरू आहे. पारमार्थिक-अध्यात्मिक क्षेत्रातील एक अग्रगण्य नियतकालिक म्हणून **'श्री साईलीला'** नियतकालिकाची गणना व्हावी असे उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेवूनच आम्ही साईसेवा करीत आहोत. त्या कार्यास आपणा सर्वांचे आशीर्वाद पाथेय म्हणून लाभावेत ही प्रार्थना!

**द. म. सुकथनकर**
संपादक

# श्री साईनाथ अर्थात सत्यदेव!

*शाम जुवळे*



***साईभक्तांचे जीवन म्हणजे सुखनिधान आहे; आनंदाचा-प्रेमाचा सुख सागर आहे. भक्ताचे दुःख दैन्य दूर करण्यासाठीच ईश्वराने श्रीसाई अवतार धारण केला असून आजही साईनामाने हजारो भक्त सुख शांतीचा अनुभव घेत आहेत.***

श्री साईबाबा हे अवतारी पुरुष असल्यामुळे साक्षित्वाने त्यांचे अस्तित्व अमर आहे. कलियुग हे असंख्य अडचणी, अडथळे, संकटे संघर्ष आणि दैन्य व दुःख यांनी भरलेले असल्यामुळे साईबाबांना मानवी देह धारण करणे भाग पडले, कलियुगांतील ही अभूतपूर्व हलाख्याची परिस्थिती हाताळणे हे असमान्य असेच कार्य आहे. भगवद् गीतेत श्रीकृष्णाने वचन देऊन ठेवल्याप्रमाणे, श्री साईबाबांच्या वेषात प्रत्यक्ष परमेश्वर जगास सावरण्याचे महान कार्यकरीत आहे.

केवळ परमेश्वरच जगात सत्याने वावरू शकतो व इतर सर्व प्राणी कर्मविषयक म्हणून जन्मास येत असतात. परमेश्वर मात्र स्वतःच्या वज्र संकल्पाने मानवीरुप धारण करुन जनकल्याणार्थ पृथ्वीतलावर अवतरत असतो. कोणत्याही प्रकारचा स्वार्थ वा अहंकार न बाळगता जनकल्याणाचे कार्य एक परमेश्वरच करु शकतो.

विश्व हे सत्यातून साकारले आहे; सत्यावरच ते पोसले जात आहे आणि अखेर सत्यातच ते विलीन होणार आहे. हे सत्यप्रणित कार्य साईबाबा करीत असल्यामुळे बाबा हे सत्यदेव आहेत. नैसर्गिक परिपाकात ढवळाढवळ न करता बाबा जनकल्याणार्थ झटत आहेत. परमेश्वराचे हे खास वैशिष्ट होय.

विश्व चालविण्याची तत्त्वत: जबाबदारी विधात्याची आहे. तेव्हा बिकट प्रसंगवेळी विधात्याला स्वत:च देहधारी होवून प्रत्यक्षपणे विश्वाची बारकाईने पहाणी करणे भाग होत असते. विधाता हे कार्य नि:पक्षपातीपणाने करीत असतो. अशावेळी व्यवहारीरित्या देण्यात आले. त्या देहाच्या नामकरणाला मुळीच महत्त्व असत नाही. याच्या उलट जगामध्ये नेहमीच्या व्यवहारात देहाच्या नामकरणाला अवास्तव महत्त्व देऊन त्या नांवाचे स्तोम माजविण्यात येत असल्याचे सर्वत्र अनुभवास येते. खरे म्हणजे हाच अहंकार व्यक्तीचे समाधान बिघडवित असतो आणि याच कारणाने माणूस दु:खी होत असतो. मनाच्यामागे धाव घेतल्यामुळे दु:खाची परंपरा लागत असते. हे आध्यात्मिक सत्य होय आणि याच सत्याचा विवेक साईबाबांनी साऱ्या जगाला प्रदान केला आहे. विवेकाला वैराग्याची जोड लागत असते, हे ओघानेच येत असते.

## कृतार्थतेची पाऊलवाट

विवेक आणि वैराग्याची कास धरल्याने श्रद्धा आणि सबुरी यांचा लाभ व्यक्तीस होत असतो. जीवनातील अलभ्य लाभ तो हाच होय. या पाऊल खुणांनी जीवनाची वाटचाल केल्याने श्री साईधामाच्या मुक्कामाला सुखरुप पोहचता येते; जीवन कृतार्थ होत असते. श्री साईबाबांची ही प्रमुख शिकवण होय.

सत्ता, विद्वत्ता आणि वित्त यांचा सदुपयोग सत्कारणीच करावा लागतो आणि हे साधण्यासाठी माणसाचे शील शुद्ध व पवित्र असावे लागते. याचाच अर्थ शील हे सर्वांत प्रथम क्रमांकाचेच आहे. उत्तम शील असल्याविना जीवन मातीमोल होत असते. उत्तम शील उत्तम शिक्षण देत असते. क्षणाक्षणाला उत्तम शील माणसाला काय चांगले - काय वाईट याचे उत्तम शिक्षण देत असते. शीलवान माणूस हाच जगातील सर्वोत्तम आणि श्रीमंत-समाधानी माणूस होय; हेच मानवाचे सद्भाग्य होय. हाती असलेला पैसा गेला तर तो पुन्हा मिळविता येतो., आरोग्य बिघडले तरी ते पुन्हा उपचार करून मिळू शकते. परंतु एकदा शील भंगले म्हणजे ते काचेप्रमाणे कायमचे गमावल्यासारखे होत असते. दक्ष राहूनच शील जपावे लागते. उत्तम शील म्हणजे उत्तम चारित्र होय. श्री साईदेवाने याचीच शिकवण सर्वांना देऊन ठेवलेली आहे. ही अत्यंत महत्वाची शिकवणच आज जगाला वाचवू शकेल. श्री साईबाबा आजच्या जगाचे खरे अध्वर्यू आहेत. यात तिळमात्र शंका नाही.

शुद्ध - सात्विक प्रेम ही बाबांच्या शिकवणुकीची भक्कम बैठक आहे. प्रेम-ज्योतच आजचे जग प्रकाशित करु शकेल. प्रेम हे विश्वातील सत्य असल्यामुळे प्रेमाचे बळ सर्वोच्च असते. प्रेमाएवढे प्रभावी शस्त्र जगामध्ये दुसरे नाही. साईदेव हेच शस्त्र हाती धरून आज जग जिंकण्यासाठी सज्ज राहिलेले आहेत. साई हे आजच्या जगातील एकमेव देव आहेत. सर्व जग आज त्यांना वंदना करीत. देत आहे. साईभक्तांसाठी ही फार मोठ्या आनंदाची बाब आहे.

"आनंदी आनंद गडे। जिकडे तिकडे चोहीकडे।।" अशी सुखदावस्था आज साईभक्तांची झालेली आहे. साईभक्तांचे सर्वांगीण प्रेम हेच या आनंदावस्थेचे कारण आहे. हृदयातील प्रेम मग बोलके होते आणि म्हणते:—

**पाऊल चाले एकापुढे एक**
**तुझ्या रे मीलनाते।**
**ओढ लागते तुझिच रे एक**
**प्रेमास येई भरते।।१।।**

**छंद तुझा तो एकचि रे जीवा**
**मन तुझ्यातचि विसावते।**
**आणि दुसरे नाहीच रे देवा**
**मनात काही उरते।।२।।**

**नाम तुझेचि गोड लागे जीवा**
**अमृत-गोडी लाभते।**
**स्वर्गचि जणु हाती लागावा**
**सत्यचि वाचा वदते।।३।।**

**आस जगाचि सोडुनिया देवा**
**आलो तुझ्या चरणाते।**
**प्रेम देऊनि उद्धारी या जीवा**
**सामावुनि घेई त्याते।।४।।**

भक्ताला साई-नामात ऐक्य गवसले असता मनातील दुजाभाव पूर्णपणे नाहीसा होत असतो. मग मनमोकळेपणाने जगात विहार करता येतो. पक्षी जसा आकाशात विहार करीत असता आकाशाला कसलाच मलीनपणा आणीत नाही त्याप्रमाणे साईभक्त जगात नांदत असता जगाला कसलाच कलंक लावित नाही. जीवन निष्कलंकपणे जगण्याचा राजमार्ग साईबाबांनी भक्तांना दाखवून ठेवला आहे. "जगा आणि इतरांना जगू द्या" हाच तो साईबाबा प्रणित राजमार्ग होय. अशा जीवनात ना खेद असतो ना खंत असते. येथे अभिलाषा म्हणून कसलीच नसते. येथे असते ते फक्त निरागस प्रेम. बोलण्यात प्रेम ऐकण्यात प्रेम, दृष्टीत प्रेम, कर्मात प्रेम, साऱ्या जीवनात प्रेमच प्रेम. भक्तांना दिसतो तो एकच एक प्रेमसाई.

■ ■ ■

## शिर्डीचा नायक

अनंत कोटी ब्रह्मांड नायक
विश्वाचाहि तू प्रतिपालक
शिर्डी ग्रामी नित्य वसशी
शिर्डीचाहि असशी नायक ।।१।।

नाम तुला ते काहीच नव्हते
लोकांनाही ठाऊक नव्हते
म्हाळसापतिने तुला देखिले
'आवो साई' लगेच बोलले ।।२।।

'साईबाबा' झाला तुम्हीं
'साईनाथ' हि झाला तुम्हीं
डोईस फडका हातात सटका
'अल्ला-मालिक' हाच खटका ।।३।।

निंब-तरूतळी वासहि तुमचा
श्रद्धा-सबुरी मंत्रहि तुमचा
या मंत्राने जगा तारुनि
सार्थ केला जन्महि आमुचा ।।४।।

अनन्य भावे शरण जो आला
बेडा त्याचा पारहि केला
जन्म मृत्यूच्या फेऱ्यामधूनि
भक्त तुमचा कधीच सुटला ।।५।।

जसे जयाने, तुम्हांस भजले
अनुभव त्याला तसेच आले
एकदांच जो 'तुमचा' झाला
तुम्हीहि कधी ना, तया सोडला ।।६।।

**—गंगाधरसूत** (ठाणे)

## "साईरुप"

**नद्या नाले भरली अपार**
**साईनाम त्यात घुमार ।।धृ।।**

**नित्य नांदते साईरुप**
**तू-मीचे हे एक स्वरुप**
**अशी वावेरे छायागार**
**अंतरंगी रंग बहार ।।१।।**

**भाव भक्तीचे आत्मरुप**
**चैतन्यात, गुंफला गोफ**
**रक्तकणांतून उठली लहर**
**गुंजे सृष्टी साईस्वर ।।२।।**

**—सादिक शेख** (मालवण)

। श्रीमद् भगवद्गीता ।

# दिव्यज्ञानाचा अमृतकुंभ

ग. के. कुलकर्णी रत्नागिरी



*श्रीमद् भगवतगीता हा जगातील एक महान तत्त्वज्ञान ग्रंथ आहे. मानवजातीच्या अंतिम कल्याणाचा, भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाच्या निमित्ताने केलेला सदुपदेश म्हणजेच गीतामृत होय. अशा गीतेबद्दल महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, विनोबा, योगी अरविंदांसह अनेक विचारवंतांनी लिहिलेले आहे. गीता म्हणजे दिव्यज्ञानाचा अमृतकुंभ आहे. त्या कुंभातील अमृत आपल्याही जीवनाला महान मंगलतेने धन्य करू शकते. गीतामृताची अगाध थोरवी कथन करणारा एक लेख —*

भगवद्‌गीता म्हणचे खऱ्या अर्थाने जीवनाचे महान दर्शन घडविणारा, जीव आणि शिव यांच्यातील संबंधाची खरी ओळख करुन देऊन दुवा साधणारा, जगातल्या सर्वोत्तम अशा महान तत्त्वज्ञानांनी भरलेला एकमेव असा अजोड ग्रंथराज आहे. पाच हजार वर्षांपूर्वी जन्माला आलेल हे महान तत्त्वज्ञान त्या काळाला जितके लागू होते त्याही पेक्षा कितीतरी पटीन अधिक ते आज उपयुक्त ठरणार आहे आणि उद्या तर त्याची गरज नितांत भासणारी आहे. गीता ही केवळ अर्जुनापुरतीच मर्यादीत शिदोरी नाही. तसे असते तर अर्जुनाला गीता सांगताना भगवंताचा रणांगणावरचा उपदेश अैकून घेण्याची आणि तिथलं प्रत्यक्ष दर्शन घडविण्याची शक्ती व्यासाकरवी त्यांनी संजयाला दिलीच नसती. त्या करवी भगवंताला या महान ज्ञानाचा प्रसार सबंध भूतली करावयाचा होता हेच खर. हे ज्ञान केवळ अर्जुनापुरतच मर्यादित स्वरूपाच असं ठेवायच असत तर भगवंताने त्याला ते कधीच सांगून टाकल असत. परंतु तस घडल नाही. त्यासाठी योग्य वेळ यावी लागली. योग्य स्थळाचा भगवंताला शोध घ्यावा लागला. रणभूमि हे क्षेत्र आणि ती वेळ भगवंताला योग्य वाटली आणि अर्जुनासारखा सत्शिष्य समोर दिसला त्याच वेळी अमृताचा हा कुंभ भगवंताने खुला केला.

ही भगवद्‌गीता भगवंताने प्रथम सूर्यदेवाला सांगितली, सूर्यदेवाने ती मनूला सांगितली आणि मनूने ती इक्ष्वाकुला सांगितली. अशा रीतीने परंपरेने प्राप्त झालेले हे महान तत्त्वज्ञान एका प्रवक्त्याकडून दुसऱ्या प्रवक्त्याकडे जालत आलेले आहे. परंतु कालान्तराने हे महान तत्त्वज्ञान, ही महान योगपद्धती मध्येच लुप्तप्राय झाले म्हणून कुरूक्षेत्राच्या रणभूमीवर भगवंताला हे महान तत्त्वज्ञान अर्जुनाला पुन्हां सांगावे लागले.

भगवान श्री कृष्णानी भगवद्‌गीतेचा उपदेश विशेषकरून अर्जुनाला सांगितला याचे कारण अर्जुन हा भगवंताचा भक्त. श्रीकृष्णाचा साक्षात शिष्य आणि श्रीकृष्णाचा जिवलग सखा होता. भगवद्‌गीतेच महान ज्ञान ग्रहण करण्यास अर्जुन सर्वार्थाने योग्य होता म्हणूनच हे महान तत्त्वज्ञान भगवंताने त्याच्या पुढे खुलं केलं. म्हणून गीतेच तत्त्वज्ञान समजावून घेताना आपण हाच भक्तिभाव अंतरी ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. भगवंताशी संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. खर म्हटल तर भक्तांचा भगवंताशी खालील पाच निरनिराळ्या मार्गापैकी कोणत्यातरी एका मार्गाने संबंध येत असतो.

१) मनुष्य कर्मसंन्यास अवस्थेतील भक्त असू शकतो.
२) मनुष्य कर्मयोग अवस्थेतील भक्त असूं शकतो.
३) मनुष्य भगवंताचा सखा या नात्याने भक्त असू शकतो.
४) मनुष्य वात्सल्य भावाने भक्त असूं शकतो.
५) मनुष्य माधुर्य भावाने भक्त असूं शकतो.

## अर्जुनाचा सख्यभाव

अर्जुनाचा भगवंताशी संबंध सख्यभाव या दृष्टीने होता. अर्थात हा सख्यभाव आणि सांसारिक सख्य यांमध्ये भिन्नतेची मोठी दरी आहे. अर्जुनाचा भगवंताशी सख्यभाव दिव्य आहे. तो प्रत्येकाला प्राप्त होणे शक्य नाही. अर्थात प्रत्येक जीवाचा भगवंताशी विशिष्ट संबंध आहेच. आणि हा संबंध भक्तीच्या पूर्णत्वाने प्रकट होतो. परंतु जीवनाच्या सध्याच्या स्थितीत आपण भगवंताला विसरलो आहोत. प्रत्येक जीवाचा भगवंताशी जो विशिष्ट असा शाश्वत संबंध आहे त्याला "स्वरूप" असे म्हणतात. भक्तियोग पद्धतीद्वारा मनुष्याला ते स्वरूप पुन्हा जागृत करता येते आणि ह्याच अवस्थेला "स्वरूपसिद्धी" म्हणजे मनुष्याच्या मूळ अवस्थेचे परिपूर्णत्व असे म्हणतात. अर्जुन हा अशातऱ्हेचा परिपूर्ण भक्त होता. त्याने भगवद्‌गीतेचा स्वीकार कसा केला हे ध्यानात घेण्यासारखे आहे. गीतेच्या दहाव्या अध्यायात

हे वर्णन आलेलं आहे. अर्जुन भगवंताला म्हणतो तुम्ही परब्रह्म, अंतिम, परंधाम, पवित्र आणि परम सत्य आहात तुम्ही शाश्वत दिव्यपुरुष आहात, तुम्ही आदि देव, चिन्मय आणि मूळ पुरुष आहात तुम्ही अजन्मा आणि सर्वव्यापी सौंदर्यसंपन्न आहात. नारद आणि व्यास यांसारखे सर्व महर्षि तुम्ही वरीलप्रमाणे आहात अशी घोषणा करतात आणि आता तुम्ही स्वत:हि मला तेच सांगत आहात. हे श्रीकृष्ण, तुम्ही जे मला सांगितले आहे ते सर्व मी संपूर्णपणे सत्य मानतो. हे भगवान तुमचे स्वरुप देवांना माहीत नाही आणि दानवानाही माहीत नाही (श्रीमद्‌भगवद्‌गीता १०.१२.१४)

वास्तविक पहाता भौतिक जीवन कसे असते या विषयी जे अज्ञान आहे त्या अज्ञानातून मानव जातीला मुक्त करणे हे भगवद्‌गीतेचे प्रयोजन आहे. प्रत्येक मनुष्याला नाना प्रकारच्या अडचणी असतात. अर्जुनाला सुद्धा कुरुक्षेत्रावर युद्ध करण्यात अडचण वाटत होती. पण अर्जुन श्रीकृष्णाला शरण गेला आणि म्हणून त्याला गीतेच्या महान तत्त्वज्ञानाचा भगवंताकडून लाभ झाला. त्याचे अज्ञान तिमिर दूर झाले. केवळ अर्जुनच नव्हे, तर आपणापैकी प्रत्येक जण ह्या भौतिक जीवनामुळे अनेक चिंतानी व्याप्त आहे. आमची तर येथील सत्ताच असतरूपी वातावरणातील आहे. वास्तविक आपण या असत्‌रूपी वातावरणाने घाबरून जावे असे नाही. कारण आपले अस्तित्व शाश्वत आहे. जे वस्तुत: नाही त्यालाच असत् म्हणतात.



## जिज्ञासेची जाणीव

दु:ख भोगीत असणाऱ्या इतक्या अनेक मनुष्य प्राण्यापैकी थोडेचजण असे आहेत की ज्यांना वस्तुत: आपल्या स्वरुपा विषयी म्हणजेच आपण कोण आहोत. आपल्याला अशा अवस्थेत का ठेवण्यांत आले आहे इत्यादी गोष्टी जाणून घेण्यासंबंधी जिज्ञासा आहे. आपण दु:ख का भोगतो या संबंधीची आपली जिज्ञासा जर जागृत झाली नाही, हा दु:खभोग टाळून सर्व दु:खातून आपल्याला सुटका करून घ्यायला हवी हे जर आपल्याला कळले नाही तर अशा मानवाला यथार्थ मानव समजता येणार नाही. म्हणून अशी जिज्ञासा आपल्या मनात जागृत झालीच पाहिजे. आपल्या मनात अशा प्रकारची जागृती होणे ही मानवतेची सुरूवात आहे. ब्रह्मसूत्रात या जिज्ञासेला "ब्रह्मजिज्ञासा" अस म्हणतात. मनुष्याला परब्रह्माच्या स्वरुपाविषयी जर जिज्ञासा नसेल तर मनुष्याची प्रत्येक कृती निष्फळ समजली पाहिजे. आपण दु:ख का भोगतो, आपण कुठून आलो, मृत्यूनंतर आपण कुठे जाणार अशा विषयासंबंधी जिज्ञासा व्यक्त करण्यास जे आरंभ करतात तेच भगवद्‌गीतेचे ज्ञान ग्रहण करण्यास योग्य असे अभ्यासक आहेत.

अर्जुन हा भगवान श्रीकृष्णाचा नित्य सहचर असल्यामुळे सर्व अज्ञानाच्या पार झालेला होता. सर्व अज्ञानातून मुक्त झालेला होता. तरी सुद्धा कुरूक्षेत्राच्या रणभूमीवर तो अज्ञानाने ग्रस्त झाला तेव्हां त्याने जीवनाच्या समस्या विषयी भगवान श्रीकृष्णाला प्रश्न विचारले आहेत. ते अशाकरितां कीं मानवांच्या भावी पिढ्यांच्या कल्याणार्थ भगवंतानी त्या समस्या कशा सोडवाव्यात याचे स्पष्टीकरण करावे आणि जीवनाच्या पद्धतीचे दिग्दर्शन करावे यासाठीच आहेत. कारण मनुष्याला नंतर त्या उपदेशानुसार वागता यावे आणि

मानव जीवनाचे कार्य पूर्ण करता यावे हा त्याचा उद्देश आहे.

भगवद्‌गीतेच्या विषयात पांच मूलभूत तत्त्वांच्या ज्ञानाचा समावेश होतो. सर्वात प्रथम ईश्वरीय विज्ञान आणि नंतर जीवांच्या स्वरूप स्थितीचे प्रतिपादन आहे. ईश्वर सर्वांचा नियंता आहे आणि जीव हे नियंत्रित आहेत. जर एखादा जीव म्हणेल की माझ्यावर कोणाचेही नियंत्रण नाही, मी पूर्ण स्वतंत्र आहे, तर असा प्राणी बुद्धीभ्रष्ट होय. जीव प्रत्येक बाबतीत निदानपक्षी त्याच्या बद्ध जीवनात तो नियंत्रित झालेला असतो. एवंच भगवद्‌गीतेतील विषयांत श्रेष्ठ नियंताईश्वर आणि नियंत्रित जीव यांचा विचार केला आहे. प्रकृती आणि काल व कर्म यांचीही चर्चा गीतेत केली आहे: विश्वाचे प्रगटीकरण विविध कर्मानी परिपूर्ण असते. सर्व जीव निरनिराळी कर्मे करीत असतात. ईश्वराचे स्वरूप काय आहे आणि त्या विश्वावर कालाचे नियंत्रण कसे आहे, जीवांच्या कर्माचे स्वरूप काय आहे या सर्व बाबीचे स्पष्टज्ञान आपल्याला भगवद्‌गीते पासून होते. ईश्वर, जीव, प्रकृती, काल आणि कर्म अशा पाच प्रतिपाद्य तत्वातून भगवद्‌गीतेने असे सिद्ध केले आहे की भगवान श्रीकृष्ण सर्वव्यापी आहे. परब्रह्म, परमेश्वर अथवा परमात्मा असे ज्याला म्हणतात तो, तोच आहे. आणि तो सर्व तत्त्वात सर्व श्रेष्ठ आहे. चैतन्य गुणांत जीव आणि ईश्वर समान आहेत. परंतु भगवंतच विश्वातील सर्व कर्मे आणि प्रकृति इत्यादिकांचा नियंता आहे. भगवद्‌गीते मध्ये ह स्पष्ट प्रतिपादण्यात आले आहे. प्रकृती स्वतंत्र नाही ती भगवंताच्या नियंत्रणाखाली क्रिया करते. ब्रह्मांडात ज्या आश्चर्यकारक घडत असलेल्या गोष्टी आपण पाहतो तेव्हां त्या सृष्टीतील अविष्कारांच्या मागे सृष्टीचा नियंता आहे हे आपण समजावून घेतले पाहीजे. कारण प्रकृती ही नियंत्याच्या अध्यक्षत्वाखाली कार्य करीत आहे. कारण एखादी गोष्ट जेव्हां नियंत्रित अशा स्वरूपात नसते तेव्हां ती वस्तू प्रगटच होऊ शकत नाही. म्हणून नियंत्याचे आस्तित्व न मानणे हे मूर्खपणाचे लक्षण आहे.

## जीव जगदीशाचा अंश

भगवंताने जीवांचा स्विकार आपला अंश म्हणून केला आहे. सुवर्णाचा एखादा कण सुद्धा ज्या प्रमाणे सुवर्णच आहे किंवा सागरातील पाण्याचा एखादा थेंब सुध्दा ज्या प्रमाणे सागरच आहे त्या प्रमाणे आपण सर्व जीव त्या सर्व श्रेष्ठ नियंत्याचे परमेश्वराचे अंश असल्यामुळे सुक्ष्म रुपाने त्याचे सारे गुण आपल्यातही आहेतच. त्या गुणांची आपण वाढ केली पाहिजे. भगवंताशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केला पाहिजे तरी पण आपण सदैव एकच गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की आपण भक्त आहोत भगवंत नव्हे. तो नियंता आहे आणि आपण सर्व नियंत्रित आहोत.

भौतिक प्रकृतिला भगवद्‌गीतेत "अपरा" प्रकृति असे म्हटले आहे आणि जीवाला "परा" प्रकृति म्हणून संबोधले आहे. परंतु प्रकृती "अपरा" असो अथवा "परा" असो ती नेहमी भगवंताच्या नियंत्रणा खालीच असते. प्रकृति स्त्रीवाचक आहे आणि ज्या प्रमाणे पत्नीच्या क्रियांवर पतीचे नियंत्रण असते त्याच प्रमाणे प्रकृतीवर भगवंताचे नियंत्रण आहे. प्रकृती नेहमी भगवंताच्या अधीन आहे आणि भगवंत तिचा नियंत्रक आहे. भगवद्‌गीतेच्या सातव्या अध्यायातील पाचव्या श्लोकात भगवंताने याबाबत स्पष्ट उल्लेख केला आहे. भगवान श्रीकृष्ण म्हणतात "प्रकृति विद्धि मे पराम्। जीवभूतां महाबाहो ययेदं धार्यते जगत्।।" म्हणजे हिच्या पलिकडे माझी एक अन्य जीव स्वरुपी परा प्रकृति आहे.

सत्व, रज आणि तम अशी त्रिगुणात्मिका प्रकृति आहे. या विविध गुणांच्या पलिकडे शाश्वत "काल" तत्त्व आहे. या तीन गुणांच्या एकत्रीकरणामुळे आणि शाश्वत कालतत्त्वाच्या नियंत्रण व देखरेखी खाली कर्मे चाललेली आहेत. ही कर्मे काला पासून चाललेली

आहेत आणि आपण त्या कर्मानुसार सुखदु:खे भोगीत आहोत. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात क्षणोक्षणी आपल्याला हा अनुभव येत असतो. यालाच 'कर्म' तत्त्व असे म्हणतात.

## ईश्वरी पाच तत्त्वे

ईश्वर, जीव, प्रकृति, शाश्वत काल आणि कर्म या सर्वांचे विवेचन भगवद्‌गीतेत केलेले आहे. या पाच तत्त्वापैकी ईश्वर, जीव, प्रकृति आणि काल ही तत्त्वे नित्य आहेत. प्रकृतीची अभिव्यक्ति अस्थायी असू शकेल पण ती अभिव्यक्ति असत्य नाही. कांही दार्शनिकांच्या मते प्रकृतीची अभिव्यक्ति असत्य आहे किंवा मिथ्या आहे. परंतु भगवद्‌गीतेचे किंवा वैष्णवांचे तत्त्वज्ञान ते मानीत नाही. जगताची अभिव्यक्ति असत्य किंवा मिथ्या मानली जात नाही. तर ती अस्थायी मानली जाते. आकाशांतून फिरणाऱ्या एखाद्या मेघाप्रमाणे ती अभिव्यक्ति आहे किंवा धान्याचे पोषण करणाऱ्या वर्षाऋतूच्या आगमनाप्रमाणे ती अभिव्यक्ति आहे. किंवा धान्याचे पोषण करणाऱ्या वर्षाऋतूच्या आगमना प्रमाणे ती अभिव्यक्ती आहे. वर्षाऋतू संपून जाताच किंवा मेघ निघून जाताच पावसाने पोसलेली सर्व पिके ज्याप्रमाणे वाळून जातात त्याच प्रमाणे प्रकृतीची ही अभिव्यक्ति ठराविक अंतराने होत असते नंतर कांही काळ ती टिकून राहते. म्हणून प्रकृती नित्य आहे, ती मिथ्या नाही. भगवंत प्रकृतीला "माझी प्रकृति" असे म्हणतात. ही प्रकृति म्हणजे भगवंताची एक वेगळी शक्ति आहे.



त्याच प्रमाणे जीवसुद्धा भगवंताशी नित्य संबंध आहे. याप्रमाणे ईश्वर, जीव, प्रकृति आणि काल या सर्वांचा एकमेकाशी संबंध आहे आणि ते सर्व नित्य आहेत. परंतू पाचवे तत्त्व हे नित्य नाही. कर्माची फळे वस्तुत: फार पुरातन असू शकतात. आपण अनादि कालापासून कर्माची सुखदु:ख रूप फळे भोगीत आहोत. मात्र आपल्या ह्या कर्मफलात आपण सांप्रत बदल घडवून आणू शकतो अर्थात हा बदल आपल्या ज्ञानाच्या पूर्णतेवर अवलंबून आहे. आपण विविध कर्मे करीत असतो. आपल्या या सर्व कर्माच्या फळापासून मुक्त होण्याकरितां आपण कोणत्या प्रकारची कर्म करावी हे आपल्याला माहीत नाही. हे खरे आहे. याचेच स्पष्टीकरण भगवद्‌गीतेत केले आहे.

ईश्वर चैतन्य स्वरूप आहे. जीव हे ईश्वराचे अंश असल्यामुळे ते सुद्धा चेतन आहेत. जीव आणि भौतिक प्रकृति या दोघांनाही प्रकृति किंवा भगवंताची शक्ति असे म्हटले आहे. परंतु या दोन प्रकृतींपैकी, एक प्रकृति जो जीव तो चेतन आहे दुसरी प्रकृती मात्र चेतन नाही. हाच त्या दोन प्रकृतिमधला फरक आहे. आणि म्हणूनच जीव प्रकृतीला "परा" प्रकृति असे म्हणतात. कारण जीव हा भगवंताप्रमाणे चेतन आहे. तथापी तो भगवंताप्रमाणे परम चैतन्यस्वरूप नाही. तसे कुणालाही म्हणता येत नाही. कारण जीव हा आपल्या पूर्णतेच्या कोणत्याही अवस्थेत परम चैतन्य स्वरूप असूच शकत नाही. तो परम चैतन्य असतो हा सिद्धांत भ्रांत आहे. जीव चेतन आहे परंतु तो पूर्ण अथवा परमचेतन नाही.

## जीव व ईश्वरातील फरक

जीव आणि ईश्वर या मधला फरक गीतेच्या

तेराव्या अध्यायात स्पष्ट झालेला आहे. भगवंत क्षेत्रज्ञ आहे म्हणजे जीवा प्रमाणे ईश्वर चेतनच आहे. परंतु जीव आपल्या विशिष्ठ शरीराचा ज्ञाता आहे. तर भगवंत चराचर सृष्टीचा ज्ञाता आहे. तो सर्वव्यापी आहे. अणू-रेणूत त्याचे अस्तित्व आहे. प्रत्येक जीवाच्या हृदयात तो वसलेला आहे. आणि प्रत्येक जीवाच्या मानसिक हालचालीचे ज्ञान त्याला आहे, हे आपण विसरून चालणार नाही. तो सर्व जीवांच्या हृदयात जीवांचा नियंता म्हणून स्थिर आहे. आणि तो प्रत्येक जीवाला त्याच्या इच्छेप्रमाणे कर्म करण्याचा आदेश देत आहे. जीवाला मात्र प्रत्यही आपण कोणते कर्म करणे उचित होईल याची सतत विस्मृती होत असते. प्रथमत: एक ठराविक पद्धतीने कर्मकरण्याचा तो निश्चय करतो. नंतर मात्र तो आपल्या कर्मात आणि कर्मफलात बद्ध होतो. एका प्रकारच्या शरीराचा त्याग केल्यानंतर तो दुसऱ्या शरीरात प्रवेश करतो. या प्रमाणे जीवाने देहांतर केले की तो आपल्या पूर्व जन्माची फळे भोगू लागतो. जेव्हां जीवसत्वगुणी होतो स्थिरचित्त होतो आणि आपण कोणती कर्मे करावी हे त्याला समजू लागते तेव्हां त्याच्या कर्माच्या स्वरुपात बदल होऊ शकतो. यावरून सिद्ध होते की कर्म हे शाश्वत म्हणजे नित्य नाही. म्हणूनच म्हटले आहे की ईश्वर, जीव, प्रकृति, काल आणि कर्म या पाच तत्त्वापैकी पहिली चार तत्त्व नित्य आहेत तर कर्म अनित्य आहे.

जेव्हां भगवंत या भौतिक विश्वात प्रकृति रुपाने अवतीर्ण होतात तेव्हां त्यांची चेतना मात्र मायेने आवृत होत नाही. कारण जर का बद्धजीवाप्रमाणे भगवंतावरही मायेचे आवरण पडले असते तर भगवंतानी हे दिव्यज्ञान भगवद्गीते द्वारा सांगितलेच नसते. कारण मायेच्या आवरणातून चेतना मुक्त झाल्या वाचून कोणालाही दिव्य विश्वाविषयी कांहीही सांगता येणार नाही. यावरून सिद्ध होते की भगवंत मायेच्या अतीत आहेत. मायेच्या दोषातून नित्य मुक्त आहेत. या उलट आमची चेतना मात्र मायेच्या आवरणामुळे पूर्ण दूषित झालेली आहे. म्हणून भगवद्गीता शिकविते की या मायेने दूषित झालेल्या चेतनेला आपण शुद्ध केले पाहिजे. जेव्हा चेतना शुद्ध होते तेव्हां आपली कर्मे ईश्वराच्या इच्छापूर्तीला अनुकूल अशी होतात. आणि त्यामुळे आपण सुखी होत असतो. याचा अर्थ व्यवहारातील आपल्या नैमितिक क्रिया थांबवून भगवद्चिंतनात रमावे असा मुळीच होत नाही. तर आपण जी नैमित्तिक कर्म करीत असतो ती करीत असताना त्या प्रत्येक कर्माच्या ठिकाणी भगवंताची आठवण ठेवून ते कर्म करावे असा आहे. यालाच भगवंताची भक्ति असे म्हणतात. भगवद्भक्तांच्या ह्या क्रिया सामान्य जीवांच्या क्रिया प्रमाणेच दिसतात. परंतु त्या क्रिया माया दूषित नसतात. एखाद्या अज्ञानी मनुष्याला वाटते की भक्त एखाद्या सर्वसामान्य मनुष्याप्रमाणेच कर्म करीत आहे. त्यावेळी त्याला हे समज नाही की भक्तांची कर्मे ही विकृत चेतनेने किंवा मायेने दूषित झालेली नसतात. तर ती कर्मे दिव्य, प्रकृतीच्या त्रिगुणातीत असतात. म्हणून आपण. सतत भक्त होण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

## बद्ध जीव व शुद्ध चेतना

मायेने दूषित झालेल्या आपल्या चेतनामय जीवाला बद्धजीव असे म्हणतात. "मी प्रकृतिजन्य आहे" अशा भ्रमामुळेच बुद्धीत विकृती निर्माण होते यालाच मिथ्या अहंकार असे म्हणतात. आणि म्हणून ज्याची बुद्धी अहंकाराने लिप्त झाली त्याला आपले यथार्थ स्वरूप समजणे कदापी शक्य नाही. त्यासीठी आपण जीवाला देहात्मा बुद्धी पासून मुक्त केले पाहिजे. ह्या मुक्तिज्ञानाचा पाठ आपल्याला भगवद्गीता देते. ज्याला स्वतंत्र होण्याची इच्छा आहे, मुक्त होण्याची इच्छा आहे त्याने प्रथम हे जाणून घेतले पाहिजे की आपण म्हणजे हे भौतिक शरीर नव्हे. "मुक्ति" याचा अर्थ देहात्म बुद्धीपासून स्वतंत्रता असा आहे. प्राकृत जगांत चेतनेवर आलेल्या मालिन्यांतून मुक्त होणे आणि शुद्ध चेतनेच्या स्वरूपात

परत येणे याला 'मुक्ति' असे म्हणतात. भगवद्‌गीतेतील सर्व शिकवणुकीचा उद्देश ही शुद्ध चेतना जागृत करणे हाच आहे. आणि म्हणून गीतेच्या उपदेशाच्या शेवटी भगवंताने आपल्या प्रिय शिष्योत्तमाला अर्जुनाला प्रश्न केला आहे. बा अर्जुना अजून तरी तुझा मोह नष्ट होऊन तूं शुद्ध चेतना अवस्थेत आलास की नाही?

शुद्ध चेतना म्हणजे भगवंताच्या आज्ञांचे पालन करणे होय. हेच शुद्ध चेतनेचे सार सर्वस्व आहे. चेतना मूळातच ह्या देहात आहे. कारण आपण भगवंताचे अंश आहोत परंतु अपरा प्रकृतीला वश झाल्यामुळे आपण बद्ध होतो. परंतु परम पुरूष भगवंत मात्र या प्रकारे कधीही बद्ध होत नाही. कारण तो तिचा स्वामी आहे. परमेश्वर आणि बद्धजीव या मधला हाच फरक आहे.



ही चेतना आहे तरी काय? चेतना म्हणजे "मी आहे" ही जाणीव. तर मग हा मी कोण आहे? चेतनेवर जेव्हा मायेचे आवरण पडते तेव्हां जीव "मी आहे" याचा अर्थ "मी सर्वांचा प्रभू आहे मी भोक्ता आहे" असाच लावून घेऊन वावरत असतो. या भौतिक विषयाचा मी स्वामी आहे. मीच सर्वस्व आहे असे प्रत्येक जीवाला वाटत असते. इथे मायेने आवृत झालेल्या चेतनेचे दोन मनोवैज्ञानिक विभाग होतात. एक विभाग असा की "मी निर्माता आहे" बापाला अस वाटत असत की माझ्या ह्या पुत्रांचा जन्म माझा मुळेच झालाय मीच यांचा निर्माता आहे. हीच भ्रांती होय. दुसरा विभाग असा की "मी भोक्ता आहे" परंतु वास्तविक पाहता भगवंतच निर्माता, स्रष्टा आणि भोक्ता आहे. जीव हा भगवंताचा अंश जरूर आहे परंतु तो निर्माता किंवा स्रष्टा अथवा भोक्ता होऊ शकत नाही. मात्र तो भगवंताचा सहयोगी जरूर आहे. तो निर्मित आहे आणि भोगला जाणारा आहे. निर्मित आणि भोग यांचे केंद्र भगवंत आहे. आणि जीव भगवंताचे सहयोगी आहेत या सहयोगामुळेच जीवांना भोग मिळतो. परमेश्वर आणि जीव यांचा संबंध, एकमेकाशी स्वामी आणि सेवक यांच्यातील संबंधाप्रमाणे आहे. जर स्वामी किंवा मालक पूर्णपणे संतुष्ट असेल तर सेवकही संतुष्ट असतो. अभिव्यक्त झालेले विश्व ज्याने निर्माण केलेल्या परमेश्वराचे ठिकाणी निर्मितीची आणि भोक्तेपणाची प्रवृत्ति असल्यामुळे जीवांच्या ठिकाणी सुद्धां तो त्याचाच अंश असल्यामुळे या प्रवृत्ति असणे स्वाभाविक आहे. तरीही परमेश्वराला प्रसन्न ठेवण्यातच जीवांचे कल्याण आहे. कारण तोच निर्माता आहे. सर्व जीव सृष्टीचा नियंता आहे हे परम सत्य आहे.

## निर्विशेष ब्रह्म

जीव, प्रकृति, शाश्वत काल आणि कर्म ह्या सर्व गोष्टी भगवंताच्या नियंत्रणा खाली असून संपूर्ण ब्रह्माण्डाचा नियंता तो परमेश्वर आहे ते पूर्णतत्त्व परमसत्य, परमब्रह्म आहे याचे संपूर्ण विवेचन भगवद्‌गीतेमध्ये करण्यात आलेले आहे. संपूर्ण सृष्टी हे भगवंताच्या विविध शक्तीचे कार्य आहे. गीतेच्या बाराव्या अध्यायात असा उल्लेख आहे की निर्विशेष ब्रह्म हे सुद्धा परतत्त्व, परब्रह्म भगवान श्रीकृष्णाचे आश्रित आहे. ब्रह्मसूत्रात या बाबत अधिक स्पष्टीकरण आढळते.

ब्रह्मसूत्रात म्हटले आहे की ब्रह्म हे सूर्याच्या किरणांप्रमाणे आहे. हे निर्विशेष ब्रह्म म्हणजे भगवंताची दैदिप्यमान किरणे आहेत. म्हणून निर्विशेष ब्रह्म ही परमसत्याची अपूर्व अनुभूति आहे. पुरूषोत्तम भगवान श्रीकृष्ण हा निर्विशेष ब्रह्म आणि परमात्म्याची आंशिक तत्त्वानुभूति यांच्या अतीत आहे. यामुळेच भगवंताला सच्चिदानंद विग्रह असे म्हटले आहे. ब्रह्मसंहितेचा प्रारंभच मुळी पुढील प्रमाणे आहे. **''ईश्वरः परमः कृष्णः सच्चिदानंद विग्रहः अनादिरादि गोविन्दः सर्वकारण कारणम्।''** श्रीकृष्ण हे सर्व कारणांचे आदिकारण आहे. तोच मूळ कारण, मूळ पुरुष आहे. तो मूर्तिमान् सच्चिदानंद आहे. निर्विशेष ब्रह्माची अनुभूति म्हणजे भगवंताच्या 'सत्' या अंशाची अनुभूति होय. तर परमात्म्याची अनुभूति त्याच्या ''चित्'' म्हणजे शाश्वत ज्ञान या अंशाची अनुभूती आल्याने होत असते. परंतु भगवान श्रीकृष्णाची अनुभूति म्हणजे त्याच्या सच्चिदानंद स्वरुपी संपूर्ण विग्रहाचा साक्षात्कारच आहे.

अल्पबुद्धि जीव परम सत्योला निराकार निर्विशेष समजतात परंतु इथे स्पष्ट होते की परमसत्य भगवान श्रीकृष्ण हा दिव्य पुरुष आहे आणि या गोष्टीला वैदिक साहित्यांत पुष्टी मिळालेली आहे. ''नित्यो नित्यानां चेतनश्चेतनानाम्'' असा स्पष्ट उल्लेख श्रीकृष्णा बद्दल वैदिक साहित्यात आढळतो. ज्याप्रमाणे आम्हां सर्व जीवांना आपले स्वतःचे स्वरुप आहे त्या प्रमाणे परमसत्य सुद्धां अंतिमदृष्ट्या पुरुष आहे आणि या परमपुरूष भगवंताचा साक्षात्कार हा सर्वात दिव्य साक्षात्कार आहे. पूर्ण परतत्त्व परमेश्वर निराकार नाही जर ते निराकार असते किंवा कोणत्याही अन्य तत्त्वाहून न्यून असते तर ते पूर्ण परात्पर सिद्ध झाले नसते. आपल्या अनुभवाच्या कक्षेत आणि आपल्या अनुभवाच्या कक्षेपलिकडे असणाऱ्या प्रत्येक गोष्टीचा समावेश यापूर्ण परतत्त्वात होतो. तसे नसते तर ते पूर्ण म्हणता आले नसते. यावरून सिद्ध होते की पूर्ण परतत्त्व श्रीभगवान श्रीकृष्ण हा अमित शक्तीनी युक्त आहे. या विविध शक्तीद्वारे श्रीकृष्ण कोणत्या प्रकारे कर्म करतात याचेही वर्णन भगवद्गीते मध्ये आलेले आहे. आपल्याला ज्या ह्या प्राकृत जगतामध्ये ठेवण्यात आलेले आहे ते सुद्धां स्वतःमध्ये पूर्ण आहे. कारण सांख्य दर्शनानुसार ज्या चोवीस तत्त्वानी बनलेल्या प्राकृत विश्वाची अनित्य अभिव्यक्ति आहे त्या तत्त्वांची अशी पूर्ण व्यवस्था केली आहे की त्यामुळे या विश्वाच्या पोषणाला आणि संस्थितीला अशी संपूर्ण साधन सामुग्री उत्पन्न व्हावी. कोणत्याही गोष्टीची न्यूनता भासू नये. कोणताही पदार्थ बाहेरून घ्यावा लागू नये. तसेच कोणत्याही पदार्थाची अनिवार्य गरज भासू नये. परंतु पूर्णतत्त्व भगवंताच्या शक्तीने ठरवून दिलेली व्यक्त सृष्टीची स्वतःची एक मर्यादा आहे. ही मर्यादा पूर्ण झाली, हा काल पूर्ण झाला की ह्या अनित्य सृष्टीतील निर्मित अंशाचा लय पूर्ण तत्त्वाच्या पूर्ण व्यवस्थेद्वारा केला जातो.

जीव हे भगवंताचे अंश असले तरी ते स्वतःपुरते पूर्ण आहेत आणि त्यांना परात्पर भगवंताची प्राप्ती व्हावी या करिता पूर्ण सुविधा केलेली आहे. परंतु जीवाला जो सर्व प्रकारच्या अपूर्णतेचा अनुभव येतो त्याला कारण पूर्ण तत्त्वाचे अपूर्ण ज्ञान हे होय. म्हणूनच भगवद्गीतेत वेद विद्येच्या पूर्ण ज्ञानाचे विवेचन करण्यात आलेले आहे. सर्व वेद विद्या ही संपूर्ण विश्वसनीय आणि प्रमादातीत आहे असे हिंदुधर्मियांनी मान्य केले आहे. कारण वेदांचे सर्वात प्रथम प्रतिपादन स्वतः भगवंतानी केले आहे. भगवंतानी केलेले हे प्रतिपादन लौकिक जगतातील मनुष्याने केलेल्या प्रतिपादनाहून भिन्न आहे. कारण लौकीक मनुष्य १) प्रमाद करतो हे निश्चित आहे. २) तो सतत भ्रांत असतो ३) इतराना सतत फसविण्याकडेच त्याचा कल असतो ४) आणि इंद्रियांच्या अपूर्णतेमुळे त्याची शक्ति मर्यादित असते. या चार दोषांमुळे साधारण मनुष्याला या सर्वव्यापी ज्ञानाचे संपूर्ण निवेदन करता

येणे शक्यच नाही.

## ब्रह्मदेव वेदांचा उद्‌गाता

वेदांचा उगम सर्वप्रथम उत्पन्न झालेला जीव की ज्याला पितामह असे संबोधण्यात येते त्या ब्रह्मदेवाकडून झाला असे मानले जाते. ह्या वैदिक ज्ञानाचा संचार ब्रह्मदेवाच्या हृदयात सर्वप्रथम झाला. परंतु त्याला हे ज्ञान भगवंताकडूनच प्राप्त झालेले आहे. नंतर ब्रह्मदेवाने हे ज्ञान आपल्या पुत्रामध्ये आणि शिष्यामध्ये प्रसृत केले. भगवंत म्हणून विश्वातील सर्व वस्तूंचा तो एकमेव स्वामी आहे. तो आदि निर्माण कर्ता आणि ब्रह्मदेवाचा निर्माता आहे. गीतेच्या अकराव्या अध्यायात भगवंताचा उल्लेख प्रतितामह असा करण्यांत आला आहे त्याचे हेच कारण आहे.



या जगात मनुष्य प्राणी, पशुप्रमाणे कष्ट करण्यासाठी जन्माला आलेला नाही. मानवी जीवनांचे महत्व समजण्याची बुद्धी त्याच्या जवळ असलीच पाहीजे. मनुष्याला आपल्या जीवनाचे ध्येय समजले पाहिजे. त्या बाबतचे मार्गदर्शन आमच्या वैदिक साहित्यात आढळते. आणि ह्या सर्व वैदिक साहित्याचे सार भगवद्‌गीतेत आलेले आहे. म्हणून भगवद्‌गीतेच्या अभ्यासाला इतर वैदिक ग्रंथ धुंडाळत बसण्याची गरज नाही. प्रकृतीच्या भिन्न गुणानुसार तीन प्रकारच्या कर्माचा उल्लेख भगवद्‌गीतेने स्पष्ट केला आहे. सात्त्विक, राजस आणि तामस. त्याच बरोबर तीन प्रकारच्या आहाराचा उल्लेखही आलेला आहे. या सर्वांचा विचार करण्यासाठी भगवद्‌गीतेच्या उपदेशाचा जर आपण योग्य उपयोग करून घेतला तर आपले सर्व जीवन शुद्ध होऊन शेवटी आपण या प्राकृतिक आकाशाच्या पलीकडे असलेल्या भगवद्‌धर्मात निश्चित पोहचूं.

या ठिकाणालाच सनातन आकाश किंवा शाश्वत दिव्य व्योम असे म्हणतात. या भौतिक जगतांतील प्रत्येक वस्तू अनित्य आहे असे आपल्याला आढळते. प्रत्येक वस्तु किंवा प्रत्येक पदार्थ उत्पन्न होतो. कांही काळ राहतो. काही उपसृजन करतो, नंतर तो क्षीण होतो आणि नंतर तो लुप्त होतो. भौतिक जगाचा हा नियम आहे. परंतु या अनित्य जगाच्या पलीकडे ज्याची माहिती आपल्याला आहे असा एक अन्य लोक आहे. हा लोक अन्य स्वरूपाचा आहे. त्याचे "सनातन" शाश्वत स्वरूप आहे. जीवाला सुद्धा शाश्वत सनातन असे म्हटले आहे. आणि गीतेच्या अकराव्या अध्यायात भगवंताचा उल्लेखही सनातन तत्त्व निर्माता असा आलेला आहे. जीवाचा भगवंताशी निकटचा संबंध आहे, आणि गुणात्मकदृष्ट्या आपण सर्व एक असल्यामुळे म्हणजे सनातन असे धाम, सनातन आकाश, सनातन श्री भगवान आणि सनातन जीव असे एक सनातनतत्व असल्यामुळे जीवाला सनातन कार्याची किंवा सनातन धर्माची पुन: जागृती करुन देणे हे भगवद्‌गीतेचे संपूर्ण प्रयोजन आहे. आपण निरनिराळ्या कर्मात तात्पुरते संलग्न झालेले असतो परंतु जेव्हां आपण या सर्व अनित्य कर्मांचा त्याग करुं आणि भगवंतानी नेमून दिलेली कर्मे करुं तेव्हांच आपली सर्व कर्मे शुद्ध होऊं शकतील. तेच आपले शुद्ध जीवन होय.

## परम सार्थकता

जीव ज्याप्रमाणे सनातन आहेत, त्या प्रमाणे

भगवंत आणि त्याचे दिव्यधाम हे दोन्ही सनातन आहेत, आणि सनातन धामातील भगवंत आणि जीव यांचा एकत्र सहयोग हीच मानवी जीवनाची परम सार्थकता आहे. भगवंत जीवा बद्दल फार कृपाळू आहेत कारण जीव हे भगवंताचे पुत्र आहेत. भगवान श्रीकृष्ण भगवद्गीतेत म्हणतात. "सर्वयोनिषु-----अहं बीजप्रद: पिता" म्हणजे मी सर्वांचा पिता आहे. अर्थात जीवांना त्यांच्या विविध कर्मानुसार सर्व प्रकारच्या विविध योनी प्राप्त होतात. परंतु भगवंत तर गीतेत म्हणतात की, त्या सर्व जीवांचा मी पिता आहे. म्हणून या सर्व पतित, बद्ध जीवांना आपल्या सनातन शाश्वत धामात परत बोलावून त्याचा अशा रीतीने उद्धार करण्या करीता भगवंत अवतार घेतात, त्यामुळे सनातन जीवांना भगवंताच्या शाश्वत सहवासात राहण्याकरता त्यांच्या स्वरुपाची पुन्हां प्राप्ती होऊ शकते. त्यासाठी भगवंत विविध अवतार घेऊन येतात किंवा आपल्या अंतरंग सेवकांना पुत्र रुपाने, किंवा आपले पार्षद किंवा आचार्य यांना बद्धजीवांच्या उद्धारार्थ पाठवितात.

यावरून सिद्ध होते की, सनातन धर्म, कोणत्याही एका धर्माच्या सांप्रदायिक पद्धतीला उद्देशून नाही. शाश्वत भगवंताशी संबंध असणाऱ्या शाश्वत जीवांचे ते शाश्वत कार्य आहे. पूर्वी सांगितल्या प्रमाणे सनातन धर्माचा संबंध जीवांच्या सनातन कार्याशी आहे. श्रीरामानुजाचार्यांनी "सनातन" शद्बाची व्याख्या अशी सांगितली आहे कीं "ज्याला आदि नाही आणि अंतही नाही" ते सनातन होय. सनातन धर्म म्हणजे असे कर्म आहे की जे बदलता येत नाही. उदाहरणार्थ पाण्यामधून रसत्व काढून घेता येत नाही. अग्नीपासून उष्णता अलग करता येणार नाही. त्याच प्रमाणे शाश्वत जीवांचे शाश्वत कार्य त्यांच्या पासून वेगळे करता येणार नाही. सनातन धर्म जीवांशी नित्य अभिन्न किंवा सलग्न आहे. म्हणून जेंव्हा आपण सनातन धर्माबद्दल बोलतो तेव्हां श्रीरामानुजाचार्यांच्या प्रमाणाच्या आधारे सनातन धर्माला आदि-अंत नाही असेच समजले पाहिजे आणि ज्याला आदि-अंत नाही ते सांप्रदायिक होऊच शकत नाही. कारण त्याला कोणत्याही बंधनानी मर्यादा घालता येणे शक्य नाही. म्हणून सनातन धर्म हा जगातील सर्व लोकांचा धर्म आहे. तेच खरे शाश्वत जीवाचे कार्य आहे असेच म्हणावे लागेल.

## जीव शाश्वत, - अविनाशी

आज जगात अनेक धार्मिक संप्रदाय अस्तित्वात आहेत. अनेक पंथ आहेत त्यांचे अनुयायी आहेत या सर्व धार्मिक संप्रदाय आणि पंथाना मानवी इतिहासाच्या वृतान्तात कुठेतरी आरंभ असलेला आपल्याला दिसून येतो. परंतु सनातन धर्माच्या इतिहासाला आरंभ नाही. कारण तो जीवांच्या नित्य बरोबरच असतो. जीवासंबंधी विचार केला तर जी प्रमाणित शास्त्रं आहेत त्यांचे प्रतिपादन असे आहे कीं, जीवाला जन्म आणि मृत्यू नाही. गीतातर म्हणते जीवाला कधीही जन्म नसतो आणि कधीही मृत्यू नसतो. तो शाश्वत आणि अविनाशी आहे आणि त्याचे अनित्य भौतिक शरीर जरी नष्ट झाल तरी त्या नाशानंतरही जीवाचे अस्तित्व चालूच असते. सनातन धर्माच्या स्वरुपाच्या संदर्भात, धर्माच्या स्वरुपाचा विचार करताना त्या शद्बाचा अर्थ (धर्म या शद्बाचा अर्थ) मूळ संस्कृत धातूच्या अर्थावरून घेतला पाहिजे. "धर्म" म्हणजे एखाद्या विशिष्ट वस्तूचा सतत टिकणारा, नेहमी अस्तित्वात असणारा गुणहोय. आपण पूर्वी विचार करताना पाहिलच आहे की, अग्नी बरोबर उष्णता आणि प्रकाश असतोच. तो त्याचा 'धर्म' आहे. जर उष्णता आणि प्रकाश नसतील तर अग्नी या शद्बाला काहीच अर्थ नाही. म्हणून आपण एक लक्षात घेतले पाहिजे की जो भाग जीवाचा नित्य सहचर आहे, अविभाज्य आणि आवश्यक आहे तो भाग म्हणजे त्याचा सनातन गुण आहे आणि हा सनातन गुण म्हणजेच त्या जीवाचा सनातन धर्म होय. सेवा हा जीवाचा सनातन धर्म आहे. आणि ही सेवा म्हणजे

परमेश्वराची सेवा होय.

आज भूतली निरनिराळे जीव निरनिराळ्या देवतांची आराधना किंवा सेवा करताना आपल्याला आढळून येतात. भगवद्गीतेत या गोष्टीला मान्यता नाही. गीतेच्या सातव्या अध्यायाच्या विसाव्या श्लोकात म्हटले आहे की ज्यांचे चित्त भौतिक विषय वासनांनी विकृत झालेले आहे ते देवतांना शरण जातात आणि त्यांच्या स्वत:च्या प्रकृतिनुसार ते उपासनेच्या विशिष्ट विधीविधानाचे पालन करतात. या श्लोकात स्पष्ट करण्यात आले आहे की जे लोक काम वासना आणि अन्य भोगेच्छा यांनी प्रेरित झालेले असतात ते इतर कनिष्ट देवतांची सेवा करुन आणि त्याना प्रसन्न करुन घेऊन आपल्या भोगेच्छा तृप्त करून घेण्याचा प्रयत्न करीत असतात. मात्र आपला जो मूळ सेवा भाव किंवा भगवंत सेवा धर्म तो ते विसरतात. जीवाने नित्य एक लक्षांत ठेवले पाहिजे कीं आपण जेव्हां 'कृष्ण' हे नाम उच्चारतो तेंव्हा ते कोणतेही सांप्रदायिक नाम नसते. "कृष्ण" याचा अर्थ परमोच्च आनंद असाच आहे. भगवान श्रीकृष्ण हा रसराज आहे. सर्व आनंदाचे आगर आहे. आपण सर्व नेहमीच आनंदाची उत्कट इच्छा करीत असतो, कारण भगवंताप्रमाणे जीवही चेतनामय आहे आणि म्हणूनच त्याना सुखाची, आनंदाची इच्छा आहे. भगवंत नित्य आनंदमयच आहे म्हणून जीवांनी भगवंताशी सहयोग केला, सहकार्य केले, नित्य भगवंत संगतीत जीव राहील तर तो जीव निश्चितच नित्य आनंदाची प्राप्ती करून घेऊ शकतो. नित्य सुखी होतो.



## स्वयंप्रकाशित धाम

भगवान श्रीकृष्णाच्या धामाचे वर्णन भगवद्गीतेतील पंधराव्या अध्यायाच्या सहाव्या श्लोकात खालील प्रमाणे आलेले आहे.

**न तद्भासयते सूर्यो न शशांको न पावकः।**
**यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम।।**

याचा अर्थ असा आहे की माझ्या परम धामाला सूर्य चंद्र व अग्नि हे प्रकाशित करीत नाहीत, आणि जो कोणी माझ्या त्या परम धामाला जाऊन पोहचतो तो कधीही या प्राकृत जगात पुन्हां येत नाही.

या श्लोकात भगवान श्रीकृष्ण सांगतात की त्या शाश्वत आकाशात सूर्य चंद्र किंवा अग्नि या पैकी कोणाची आवश्यकता नसते, कारण ते चिदाकाश माझ्या ब्रह्म ज्योतीने आधीच प्रकाशित झालेले असते. ती ब्रह्मज्योती म्हणजे भगवंतापासून नि:सृत झालेले किरण होत. चिदाकाशातील त्या दैदीप्यमान किरणामध्ये असंख्य लोक वावरत आहेत. ही ब्रह्मज्योती भगवद् धाम जो कृष्णलोक त्या पासून नि:सृत होते आणि अप्राकृत असणारे आनंदमय चिन्मय असा वैकुंठलोक त्या किरणामध्ये वावरत असतात. जो त्या चिन्मय आकाशांत जाऊं शकतो त्याला पुन्हां या प्राकृत आकाशात उतरावे लागत नाही. प्राकृत आकाशातील अत्युच्च लोक म्हणजे तो ब्रह्मलोक तेथे जरी आपण गेलो तरी आपल्या जीवनाच्या त्याच चार अवस्था जन्म, मृत्यू, व्याधि आणि जरा या अवस्था तेथेही आढळतात. ब्रह्मलोकात जर असे असेल तर मग चंद्रलोका विषयी बोलायलाच नको. भौतिक विश्वांतील

कोणताही लोक भौतिक जीवनातील या चार अवस्थांपासून मुक्त नाही. म्हणूनच भगवंत भगवद्‌गीतेत म्हणतात "आब्रह्मभुवनाल्लोकाः पुनरावर्तिनोऽर्जुन"। जीव एका लोकातून दुसऱ्या लोकात प्रवास करून जातात ही यांत्रिक व्यवस्था नव्हे तर ही एक आध्यात्मिक प्रक्रिया आहे. चंद्र सूर्य आणि उच्चतर लोक यांना स्वर्गलोक म्हणतात. अशा प्रकारच्या लोकांच्या उच्च, मध्यम आणि निम्नलोक अशा तीन अवस्थांच्या श्रेणी आहेत. पृथ्वी हा मध्यम श्रेणीतील लोक आहे. भगवद्‌गीतेत आपल्याला उच्चतर लोकांत-देवलोकांत कसे जावे हे एका साध्या पद्धतीने सांगितले आहे. "यान्ति देवव्रतादेवान्" मनुष्याने फक्त त्या विशिष्ट लोकाच्या विशिष्ट देवतेची आराधना करावी आणि या पद्धतीने चंद्र, सूर्य किंवा कोणत्याही उच्चतर लोकांत जावे.

भगवद्‌गीतेच्या पंधराव्या अध्यायात प्राकृत जगाचे यथार्थ वर्णन दिले आहे.

**ऊर्ध्वमूलमधः शाखमश्वत्थं प्राहुरव्ययम।**
**छन्दांसि यस्य पर्णानि यस्तं वेदस वेदवित्।।**

असा एक अश्वत्थ वृक्ष आहे की ज्याची मुळे वर आणि त्याच्या शाखा खाली आहेत आणि वैदिक मंत्र ही त्याची पाने आहेत. जो या वृक्षाला जाणतो तो पुरुष खरा वेदवेत्ता म्हणून ओळखला जातो.

## वैकुंठलोकाची प्राप्ती

या श्लोकात प्राकृत जगाला ज्याची मुळे वर आहेत आणि शाखा खाली आहेत अशा वृक्षाप्रमाणे म्हटले आहे. हे प्राकृत जग आध्यात्मिक जगाचे किंवा वैकुंठ जगताचे प्रतिबिंबं आहे. प्राकृत जग हे सत्याची केवळ छाया आहे. या छायेत सत्यता अथवा वास्तविकता नाही. परंतु त्या छायेवरुन आपल्याला असे कळू शकते की सत्यत्व आणि सत्यता ही आहेत. वाळवंटात पाणी नसते पण मृगजळा वरुन असे सुचते की पाणी म्हणून काही तरी वस्तू आहे. प्राकृत जगाची तीच स्थिती आहे. इथे खरे सौख्य नाही. सौख्याचा आभास आहे. खरे सौख्य त्या आध्यात्मिक जगात वैकुंठ लोकात आहे. आता ह्या वैकुंठ लोकाची किंवा त्या सनातन धामाची प्राप्ती कुणाला होऊ शकते. याबद्दल भगवंत सांगताहेत की,

**निर्मान मोहा जितसंगदोषा अध्यात्मनित्या विनिवृत्तकामाः।**
**द्वन्द्वैर्विमुकताः सुखदुःख संज्ञैर्गच्छन्त्यमूढाः पदमव्यय तत्।।**

जो मनुष्य आसक्ती, मोह या पासून मुक्त झाला आहे आणि भगवद् भक्तीत पूर्ण अनुरक्त झाला आहे तो मनुष्यच ह्या अविनाशी सनातन धामाला जाऊन पोहचतो असा याचा अर्थ आहे. आज आपण तर सारे उपाधीच्या मागे लागलेले आहोत. कोणाला पुत्राची आसक्ती आहे, कुणाला धनाची तर कुणाला सत्तेचा मोह आहे. जबरदस्त आसक्ती आहे. जोपर्यंत आपण या उपाधीत आसक्त आहोत, तोपर्यंत आपण शरीरात आसक्त आहोत. कारण उपाधि या शरीराच्या असतात. परंतु आपण म्हणजे आपले शरीर नव्हे, ही अनुभूती येणे ही आध्यात्मिक साक्षात्कारीची पहिली अवस्था आहे. आपण त्रिगुणात्मक प्रकृतीच्या संसर्गात आहोत त्यापासून मुक्त होण्यासाठी आपण भगवद् भक्तीत अनुरक्त झाले पाहिजे. आपण जर भगवद्भक्ती पासून दूर राहिलो तर अखेर पर्यंत या त्रिगुणाच्या बेडीतच अडकून पडूं आणि मग प्रकृतीच्या त्रिगुणापासून आपण मुक्त होऊं शकणार नाही. उपाधी आणि आसक्ति यांना कारण कामवासना, प्रकृतीवर प्रभूत्व गाजविण्याची आपली जबरदस्त इच्छा या गोष्टी कारणीभूत आहेत. जोपर्यंत प्रकृतीवर प्रभूत्व गाजविण्याच्या आपल्या प्रवृतीचा आपण त्याग करीत नाही तो पर्यंत सनातन धामांत पुनः प्रवेश होण्याची शक्यता नाही. जो मनुष्य मिथ्या भौतिक उपभोगाच्या आकर्षणाने भ्रान्त झालेला नाही, जो मनुष्य भगवंताच्या सेवेत स्थित असतो त्याच मनुष्याला अविनाशी अशा त्या भगवद् धामाची प्राप्ती होते. जो मनुष्य या प्रमाणे स्थित आहे तो त्या परमधामाला

सहज प्राप्त करून घेऊ शकतो. तेच आपल्या जीवनाचे उद्दीष्ट असले पाहिजे. ह्या अविनाशी परम धामा बद्दल भगवंताने गीतेच्या आठव्या अध्यायाच्या पाचव्या श्लोकात अधिक स्पष्टीकरण केलेले आहे.

**अन्तकाले चे मामेव स्मरन मुक्त्वा कलेवरम्।**
**य: प्रयातिस मद्भावं याति नास्त्य संशय:।**

भगवंत म्हणतात, जो कोणी आयुष्याच्या अंतकाली माझे स्मरण करीत आपल्या शरीराचा त्याग करतो त्याला तात्काळ माझ्या पराप्रकृतीची प्राप्ती होते यात कांहीही संशय नाही. म्हणून सदैव आपण भगवद् चिंतनात निमग्न राहीले पाहिजे. प्रत्येक कार्यारंभी त्याचे स्मरण केले पाहिजे. भगवद् चिंतनात निमग्न राहणे म्हणजे सर्व नैमित्तिक कर्माचा त्याग करून त्याच्या नावाने टाळकुटीत बसणे असा नव्हे तर आपली नैमित्तिक कामे करीत असतानाच त्याचे स्मरण ठेवणे मुखाने नाम आणि हाताने काम असा आहे.

## अंतकाली भगवंत स्मरण

आपण सदैव त्याच्या चिंतनात निमग्न राहण्याची आपल्या मनाला सवय लावून ठेवली तर निश्चितच अंतकाली त्याचे विस्मरण होणार नाही. कारण आपल मन हे सवयीच गुलाम आहे. सवयीनुसार ते भगवंताच आपोआपच स्मरण करीत राहिल. आणि विनासायास आपल्याला त्या अविनाशी परम धामात घेऊन जाईल. वरील श्लोकात भगवंताने मद्भाव: असा जो उल्लेख केला आहे तो मद्भाव: म्हणजे भगवंताची परा प्रकृती होय. भगवंत सच्चिदानंद विग्रह आहे. आपले वर्तमान शरीर सच्चिदानंदरूपी नाही. ते असत् नाही, शाश्वत नाही, ते विनाशी नाही, ते चित् नाही म्हणजे ज्ञानमय नाही तर ते अज्ञानमय आहे. आपल्याला भगवद् धामाचे ज्ञान नाही. तसेच या प्राकृत जगताचे सुद्धा आपल्याला संपूर्ण ज्ञान नाही. कारण या प्राकृत जगतातील अनेक गोष्टी आपल्याला अज्ञात आहेत. आपले शरीर हे निरानन्दही आहे. म्हणजे आनंदमय असण्या ऐवजी ते दु:खमय आहे. आपल्याला प्राकृत जगात ज्या सर्व दु:खाचा अनुभव येतो ती दु:खे देहापासून उत्पन्न होतात. परंतु भगवंताचे चिंतन करीत जो मनुष्य या देहाचा त्याग करतो त्याला तत्काल सच्चिदानंद देहाची प्राप्ती होते. भगवान श्रीकृष्णानी वरील श्लोकात स्पष्टपणे सांगितले आहेच की "तो माझ्या स्वरूपाला तात्काल प्राप्त होतो.

ह्या देहाचा त्याग आणि प्राकृत जगतात दुसऱ्या देहाची प्राप्ती याची प्रक्रीया सुद्धां आधिच ठरलेली असते. मनुष्याच्या पाप-पुण्य कर्माचा सारा हिशोब व्यवस्थित ठेवलेला असतो. त्यानुसार पुढील जन्मात मनुष्याला कोणत्या देहाचा आकार प्राप्त होईल हे आधीच ठरल जात आणि नंतरच मनुष्याचा मृत्यू होतो. हा निर्णय भगवंताचे उच्चतर अधिकारी करीत असतात. जीव स्वत: हा निर्णय करीत नाही. त्याला तसा अधिकार नाही. पुढील जन्मात आपली उन्नती होणार की अवनति होणार हे या जन्मातील कर्मावर ठरल जात. म्हणून आपण नित्य एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की वर्तमान जीवन हे भावी जीवनाची तयारी आहे. जर आपण त्या जीवनातच भगवत्धामाची प्राप्ती करण्याइतकी तयारी करु शकलो तर या प्राकृत देहाचा त्याग केल्यानंतर निश्चितपणे आपल्याला भगवंताप्रमाणे अप्राकृत देहाची प्राप्ती होऊ शकेल.

योगी मनुष्यांचे, ब्रह्मवादी, परमात्मवादी, आणि भक्त असे विविध प्रकार आहेत आणि ब्रह्मज्योतीत म्हणजे चिन्मय आकाशात असंख्य वैकुंठ धाम आहेत. या चिन्मय लोकांची संख्या या प्राकृत जगांतील सर्व लोकांच्या संख्येपेक्षा पुष्कळच अधिक आहे. हे प्राकृत जगत् सर्व सृष्टीच्या एक चतुर्थांशाएवढेच आहे. सृष्टीच्या या प्राकृतिक अंशात लाखो कोटी ब्रह्मांडे आणि त्यांत सहस्त्रो खर्व लोक व सूर्य नक्षत्रे आणि चंद्र आहेत. परंतु तरीही हे संबंध प्राकृतिक विश्व अखिल सृष्टीच्या